# मानवाधिकार व भारतीय आदिवासी

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे,** विभागप्रमुख राज्यशास्त्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

.................................................................................................................

**प्रस्तावना**

सभ्य समाजाची आधारशीला म्हणून मानव अधिकाराकडे पाहिले जाते. शासन कोणत्याही प्रकारचे असले तरी प्रत्येक शासनव्यवस्थेचे एक अभिन्न अंग म्हणून मानव अधिकार कार्यरत आहेत. लोकशाही शासनव्यवस्थेत इतर शासनव्यवस्थांच्या तुलनेत मानव अधिकरांची प्रायोगिकता व प्रासंगिकता जास्त प्रमाणात आहे. प्रत्येक मानवी समाजातील विकासाची प्रक्रिया ही त्या समाजाला दिल्या गेलेल्या मानव अधिकारांच्या प्रमाणबध्दतेवर अवलंबून असते. मानव अधिकारांना महत्त्व देणाऱ्या समाजाला सभ्य व सुसंस्कृत समाजव्यवस्था म्हणून आज ओळखले जाते. मानव अधिकार सार्वभौमिक स्वरूपात जगातील सर्वच देशांमध्ये आढळून येतात. प्रत्येक देशांनी आपआपल्या नैतिक शास्त्रांमध्ये आवश्यकतेनुसार कोणत्या ना कोणत्या स्वरूपामध्ये मानव अधिकारांचा समावेश केलेला आहे. हे वेगवेगळया देशांच्या राज्यघटना आणि पारंपारिक अंगांमधून दिसून येते.

**मानव अधिकारांचा विकास**

मानवाला जन्मापासून मिळालेले अधिकार म्हणजे मानव अधिकार अशी सर्वसाधारण धारणा आहे. प्रत्येक व्यक्तीला वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर विचारसरणी, राष्ट्रीय अथवा सामाजिक उत्पत्तीस्थान, मालमत्ता, जन्म किंवा इतर कोणत्याही दर्जाच्या आधारावर भेदभाव न करता त्याच्या अथवा तिच्या अधिकारांचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे.

मानव अधिकार कायद्याद्वारे मानव अधिकाराची सनदशीर, कायदेशीर मार्गाने हमी दिली गेली आहे. यामुळे मानवी सन्मान (Dignity) आणि मूलभूत स्वातंत्र्य (Freedom) यामध्ये हस्तक्षेप करणाऱ्या कृत्यांपासून व्यक्तीचे आणि मानवी समुहाचे रक्षण होते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील पारंपारिक कायदे, करार, कलमे, कायद्याची मूलतत्त्वे आणि इतर कायद्यांच्या स्त्रोतामध्ये मानवी अधिकार अभिव्यक्त केले आहेत. मानवी अधिकार कायद्याने राष्ट्रांना विविध, विशिष्ट पध्दतीने वर्तन करण्याचे बंधन असून मानवी अधिकारचे उल्लंघन करणारे काही विशिष्ट उपक्रम राबविण्यास प्रतिबंध केला आहे. असे असूनही प्रत्येक व्यक्तीस 'मानव' म्हणून जन्मापासून हक्क मिळालेले असल्याने हा कायदा मानव अधिकारांची नव्याने प्रस्थापना करीत नाही. व्यक्ती आणि सामाजिक गटांच्या मानव अधिकारांचे, अधिकारांच्या उपभोगात हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही कृत्यापासून किंवा सरकारद्वारे दुर्लक्षित कृत्यापासून करार व कायद्याचे इतर स्त्रोत औपचारिक संरक्षण करतात.

मानव अधिकार संकल्पनेचा उल्लेख सर्वप्रथम 'हेन्री डेव्हीड थोरी' या विचारवंताने आपल्या 'डिसओबीडीअन्स' या ग्रंथात केला आहे. तेव्हापासून मानवी हक्क शब्द जागतिक पातळीवर प्रचलित आहे.[१] मानव अधिकार ही एक गतिशील संकल्पना आहे. जिने काळानुरूप स्वत:मध्ये बदल घडवून घेतला आहे व परिस्थितीनुरूप ती स्वत:मध्ये सतत बदल घडवून घेत असते. प्राचीन व मध्ययुगीन काळात मानवी अधिकार देण्याबाबतचा कोणताही विचार केला जात नव्हता. थोडक्यात 'बळी तो कानपिळी' संस्कृती होती तिला मोडीत काढून सुसंस्कृत समाजातील असे सर्व अधिकार आज समाजातील प्रत्येक मानवास उपलब्ध करून देण्यात आले आहेत. २१ व्या शतकात मानव अधिकारांच्या रक्षणाकरिता अनेक शासकीय व अशासकीय संघटना कार्यरत झालेल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून जागतिक स्तरावर युनो, युनेस्को, सार्क यासारख्या संस्था मानव अधिकारांच्या रक्षणासाठी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे भारतामध्येही प्रामुख्याने केंद्रिय मानव अधिकार आयोग व विविध घटकराज्यांमध्ये राज्य मानव अधिकार आयोग कार्यरत आहेत. याशिवाय अनेक गैरसरकारी संघटनाही यासंदर्भात विविध विषयांवर आपली भूमिका योग्यपणे पार पाडत आहेत.

माणसाला माणूस म्हणून मिळणारे हक्क ते मानवी हक्क होय. मानवी हक्कांचे महत्व पहिल्यांदा १२१५ मध्ये इंग्लंड या देशात सांगण्यात आले. इंग्लंड नंतर १७७६ मध्ये अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्यात सर्व व्यक्ती समान असून त्यांचे अधिकार त्यांना मिळाले पाहिजेत असे घोषीत करण्यात आले. अमेरिकेच्या पाठोपाठ १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांत्यांमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवी मुल्यांच्या संवर्धनाची घोषणा करण्यात आली. फ्रेंच राज्यक्रांती नंतर मानवी हक्कांच्या संरक्षणाचे महत्व वाढले. मानवी हक्क संरक्षणाचे खरे महत्व जाणवले ते दुसऱ्या महायुध्दानंतर १० डिसेंबर १९४८ रोजी जागतिक पातळीवर मानवी हक्क संरक्षणाचे महत्व समजण्यासाठी 'मानवी हक्क दिन' साजरा करण्यात आला.

भारतीय राज्यघटना प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्याय, समता व प्रतिष्ठा कोणत्याही भेदभावाशिवाय प्रदान करते. भारतीय राज्यघटनेत मानव अधिकारासंदर्भात मूलभूत अधिकारामध्ये असे म्हटले आहे की, देशातील कोणत्याही नागरिकांबाबत धर्म, जात, लिंग, वंश, जन्मस्थान या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जावू शकत नाही. मूलभूत अधिकारांमध्ये या सर्व बाबी सांगितल्या असल्या तरी मार्गदर्शक तत्वेही आपली भूमिका पार पाडतात. भारतात सन १९९३ साली पारित झालेल्या मानव अधिकार संरक्षण कायद्याच्या दुसऱ्या भागात मानव अधिकारांची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगण्यात आलेली आहे. मानव अधिकार म्हणजे कोणत्याही व्यक्तीच्या जीवन, स्वातंत्र्य, समता आणि त्यांच्या प्रतिष्ठेशी संबंधीत असे हक्क ज्याची हमी भारतीय संविधानाद्वारे दिली गेली आहे. अथवा ज्यांच्या समावेश आंतरराष्ट्रीय करारांमध्ये केला असून सदर करारान्वये या हक्काची स्थापना करण्याचे कायदेशीर बंधन भारत सरकारवर आहे.[२] भारतात संविधानाने दिलेले हक्क हे मानव अधिकार समजले जातात, त्याखेरीज माणसाला 'माणूस' म्हणून जगविणारे सर्व हक्क हे मानवी अधिकार समजले जातात.

**मानव अधिकारांचा अर्थ**

मानव अधिकार म्हणजे असे अधिकार ज्यांची हमी सर्व राष्ट्रातील भिन्न प्रकारच्या संस्कृतीच्या लोकांना देण्यात आली आहे. कारण ते मनुष्य म्हणून जन्माला आले आहेत. मानव अधिकार हे निसर्गतः विश्वव्यापी, अनुवांशिक आणि अदेय आहेत. त्याचबरोबर जगण्यास योग्य परिस्थिती निर्माण व्हावी यासाठी मानव अधिकारांचा सतत संघर्ष सुरूच असतो. मानवाने मानवाचा व्यक्ती या नात्याने केलेला सन्मान व त्यासाठी केलेला संघर्ष म्हणजे मानव अधिकार होय. मानव अधिकारासंदर्भात ते अदेय असल्याचे म्हटले जाते. म्हणजेच जे मानवापासून हिरावून घेता येवू शकत नाहीत व अशा अधिकारांना जेव्हा हिरावून घेण्याचा प्रयत्न केला जावू शकतो तेव्हा वेगवेगळया प्रकारच्या यंत्रणा त्याचे रक्षण करण्यासाठी सतत कार्यरत असतात.

मानव अधिकार सिध्दांताचे लक्ष प्रत्येक माणसाला किमान चांगले जीवन जगता येईल, याकरिता मूलभूत सुविधा कोणत्या असल्या पाहिजेत ते शोधून काढणे, हे असते. मानवी इतिहासाकडे नजर टाकल्यावर हे लक्षात येते की, 'मात्स न्याय' संकल्पनेनुसार अधिकार हे फक्त बलाढ्यापुरतेच मर्यादित होते. शारिरीक व आर्थिकदृष्टया दुर्बल व्यक्तींचा या अधिकारांशी कसल्याही प्रकारचा संबंध नव्हता. यामागे कारणेही तशीच होती. ती म्हणजे अशा लोकांच्या अधिकारांचे रक्षण करणाऱ्या यंत्रणाही उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे मानव अधिकारांचे हनन होण्याच्या घटना सर्रासपणे घडत असतए आज ही परिस्थिती पूर्णतः बदलेली आहे. आज आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच स्थानिक स्तरावर कार्यरत असणाऱ्या सरकारी व गैरसरकारी अशा सर्व प्रकारच्या संघटना आणि संस्था मानव अधिकारांच्या रक्षणासाठी पुढे येत आहेत.

मानव अधिकाराच्या सिध्दांतानुसार अशी अपेक्षा करण्यात येते की, सर्व जनतेला किमान चांगले जीवन जगता यावे याकरिता आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीत एकसमान आकृतीबंध निश्चित केला जावा. मूलभूत अधिकारावर

आधारित स्वत:ची कर्तव्ये कायमची टाळण्याचे एक विधीमान्य साधन म्हणून राष्ट्रीय सार्वभौम सत्तेचा ढालीसारखा उपयोग राज्य करू शकत नाही. राष्ट्रीय सार्वभौम सत्तेचा कठोर विचार आणि निर्णयापूर्वी मानव अधिकारांचे नैतिक समर्थन केले गेले पाहिजे. मानव अधिकारांच्या मुळाशी जी संकल्पना आधारभूत असते ती ही की, सर्व राष्ट्रांकडून पालन केले जातील असे योग्य कायदेशीर मानव अधिकारांचे निकष निर्माण केले गेले जाणे अपेक्षित आहे. कारण मानव अधिकार हे नागरिकांसमोर निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे उत्तर आहे.

**मानव अधिकारांचे स्वरूप**

मानव अधिकार ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. म्हणून आज मान्यता पावलेल्या या मानव अधिकारांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

- व्यक्तीची मागणी ही न्याय, तर्कसंगत, नि:स्वार्थी आणि सार्वत्रिक स्वरूपाची असेल तर त्यास समाजाची व राज्याची मान्यता मिळते.
- व्यक्तीने आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी केलेल्या न्यायमागणीस समाजाची व राज्याची मान्यता असणे म्हणजे अधिकार होय.
- मानव अधिकार हे नैतिक स्वरूपाचे आहेत. कोणत्याही राज्याने त्यांचे उल्लंघन केल्यास त्या राज्याविरूध्द कारवाई करणारे जागतिक सरकार नाही म्हणून प्रत्येक राज्याने त्यांची अंमलबजावणी करणे हे आपले नैतिक कर्तव्य समजले पाहिजे.
- कोणतेही अधिकार अमर्यादित नसतात. म्हणजेच मर्यादित स्वरूपाचे असतात. अधिकारांना कर्तव्याची जोड दिलीच पाहिजे. मानव अधिकारांवरही आरोग्य आणि नितीमत्ता यांची बंधने घालावी लागतात. परंतु ही बंधने अवाजवी स्वरूपाची नसावीत.
- मानव अधिकार या संकल्पनेचा सार्वत्रिकरित्या स्वीकार झालेला दिसून येतो. ते कमी अधिक प्रमाणात नागरिकांना मिळालेले असतात. लोकशाही देशात अधिकार आणि स्वातंत्र्य व्यापक स्वरूपात असतात तर अन्य देशात ते मर्यादित असतात.
- समाजातील ठराविक लोकांना मिळणारे अधिकार विशेषाधिकार असतात आणि ते इतरांवर जुलुम करणारे असतात. लोकशाहीच्या विकासाबरोबर हे विशेषाधिकार मोडित निघाले व त्यांना सार्वत्रिक स्वरूप मिळाले. उदा. मतदानाचा अधिकार.

मानव अधिकारांच्या जागतिक जाहिरनाम्याच्या भूमिकेनुसार मानवी अधिकार म्हणजे मानवाचे अविभाज्य, वैश्विक आणि परस्परावलंबी अधिकार होत.

**मानवी अधिकारांची वैशिष्टये**

मानवी अधिकारांची वैशिष्टये पुढिलप्रमाणे सांगता येतील.

- वैश्विकता –( Universality )
  मानवी अधिकार हे वैश्विक स्वरूपाचे असतात ते केवळ एक व्यक्तिपुरते, एका समाजापुरते मर्यादीत नाहीत. जगातील प्रत्येक व्यक्तिला माणुस या नात्याने ते अधिकार व्यापक प्राप्त झाले आहेत.
- व्यक्तिनिष्ठता –( Individualistic )
  मानवी अधिकार हे व्यक्तिनिष्ठ आहेत. समुहाच्या अधिकारापेक्षा व्यक्तिचे अधिकार महत्वाचे असुन व्यक्तिस्वातंत्र विचार, श्रध्दा, उपासना, भाषण इ. अधिकार मानवी अधिकारा मध्ये व्यक्तिला प्राप्त झाले आहेत.
- परमोच्चता –( Paramountcy)
  मानवी अधिकार हे सर्वोच्च आहेत. मानवी अधिकारांचे संरक्षण करणे हे विविध संस्थेबरोबरच कायद्यांची देखील भुमिका असते म्हणुन विविध देशांचे राज्यघटनेमध्ये मुलभुत अधिकारांची हमी दिलेली आहे.
- व्यावहारिकता –( Practicability )

व्यावहारिक पातळीवर प्रत्येक व्यक्तिच्या आर्थिक आणि सामाजिक गरजा पुर्ण करणे शासनाला शक्य नसले तरी व्यक्तिला जगण्यासाठी आवश्यक किमान सुविधा शासन निश्चितच पुरवु शकते कारण मानवी अधिकाराचे स्वरूप हे व्यावहारिक आहे.

- कायद्याचे राज्य —( Rule of Law )

  कायद्याचे अधिराज्य असेल तर मानवी अधिकाराची हमी जास्त प्रमाणात मिळते कारण ते मानवी अधिकार कायद्याच्या कसोटीमध्ये अंमलबजावणी केलेले असतात. त्याच्यातुन मानवी अधिकारांची हमी दिलेली असते.

  अशाप्रकारे मानवी अधिकार हे व्यापक असुन आजपर्यंतच्या वाटचालीत मानवाने स्वत:च्या मानवी कल्याणासाठी अधिकारांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत यामध्ये मानवी अधिकार महत्वाचे आहेत.

**मानवी हक्क व भारतीय संविधान**

भारतीय घटना समिती गठित झाल्यानंतर दोन वर्षांनी मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा प्रसिध्द झाला. हा मानवी हक्कांचा जाहिरनामा भारतीय संविधानाने तंतोतंत स्विकारलेला दिसतो. भारतीय संविधानातील मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वांच्या भागात मानवी हक्क जाहिरनाम्याचे प्रतिबिंब पहावयास मिळते. उदा. मानवी हक्क जाहिरनाम्याच्या पहिल्या कलमा प्रमाणे सर्व माणसे जन्मत: मुक्त आणि पतिष्ठा व त्यांच्या हक्का बाबतीत समान असतात यास भारतीय संविधानाने १४ व्या कलमाने समाविष्ठ करतात राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही. याप्रमाणे मानवी हक्क जाहिरनाम्यातील कलम नं २ ते २९ ला भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्कांचे तिसरे प्रकारण व मार्गदर्शक तत्त्वांचे चौथे प्रकरण सकारात्मक प्रतिसराद देत मानवी हक्कसंची प्रतिष्ठापना करताना दिसते.

मानवी हक्क म्हणजे काय यासंदर्भात भारतातल्या मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ नुसार मानवी हक्क म्हणजे जीवन स्वातंत्र्य, समानता आणि व्यक्तीचा सन्मानाने जगण्याचा अधिकार. हा हक्क भारतीय घटनेच प्रत्येक नागरिकाला प्रदान केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर या हक्काचे मूल्य राखले जाते. तर भारतात या हक्कांना कायद्याने संरक्षण दिले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, कायद्यासमोर समानता याचा समावेश असलेले नागरिकांचे मूलभूत हक्क आणि शिक्षणाचा अधिकार, समान वेतनाचा अधिकार, व्यक्तीच्या आत्मसन्मानाचा अधिकार, कायद्याकडे दाद मागण्याचा अधिकार यासारख्या हक्कांचा समावेश घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये करण्यात आला आहे.[३]

भारताच्या राज्यघटनेने मानवी हक्क याविषयी अंमलबजावणीची नुसतीच खात्री दिली नाही तर त्याचा समावेश आंतरराष्ट्रीय करारानुसार भारतीय राज्यघटनेत करून त्याची अंमलबजावणी भारतातील न्यायालयाकडे सोपविली आहे. आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाला वरील सर्व अधिकार बहाल केले आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्त्वांचा समावेश संविधानात केला आहे.

मानवाला व्यत्किमत्त्व विकास साधण्यासाठी हक्कांची आवश्यकता असते. त्यामुळेच लोकशाही समाजव्यस्थेत हक्कांना समावेश करण्यात आले आहे. आधुनिक काळात जगातील अनेक देशाच्या राज्यघटनेत मुलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला असल्याचे पहावयास मिळते. आपल्या घटनाकारांनी मुलभूत हक्कांना घटनेत स्थान दिले आहे. त्यामुळेच मुलभूत हक्कांना घटनात्मक संरक्षण मिळाले आहे. भारतीय राज्यघटनेतील तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत हक्कांची चर्चा करण्यात आली आहे. यामध्ये समतेचा हक्क, पिळवणुकीविरूध्दचा हक्क व घटनात्मक उपाययोजनाचा हक्क यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

**मानवी हक्कांशी सबंधीत भारतीय कायदे**

मानवी हक्कांच्या संरक्षण व संवर्धनावर नियंत्रण असणाऱ्या काही महत्वाच्या राष्ट्रीय कायद्यांची यादी पुढील प्रमाणे आहे.

- मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३
- अल्पसंख्यांकासाठी राष्ट्रीय आयोग कायदा १९९२
- महिलांसाठी राष्ट्रीय आयोग कायदा १९९०
- नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५
- अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८७
- हाताने भंगीकामाचा उद्योग आणि शुष्क सौचालयांचे बांधकाम प्रतिबंध कायदा १९९३
- अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा१९५६
- स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६
- हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१
- सती जाणे प्रतिबंधक कायदा १९८७
- प्रसुतिविषयक लाभ कायदा १९६१
- बालविवाह विरोध कायदा १९२९
- बालक (श्रमाची प्रतिष्ठा) कायदा १९३३
- अनाचालयाचे आणि इतर धर्मदाय गृह देखरेख आणि नियंत्रण कायदा १९६०
- बालक कायदा १९६०
- बाल कामगार प्रतिबंध आणि नियमन कायदा १९८६
- अल्पवयींनासाठी न्यायदान कायदा १९८६
- तरूण व्यक्ती अपायकारक प्रकाशन कायदा १९५६
- जात अपात्रता निरसन कायदा १९५०
- मानसिक आरोग्य कायदा १९८७
- वेठबिगार पध्दती निर्मूलन कायदा १९७६[४]

या शिवाय ही २० पेक्षा अधिक कायदा भारत सरकारने परत केलेले आहेत. जे मानवी हक्कांच्या अंमलबजावणीचा आग्रह धरतात.

भारतीय समाज जीवन व जीवन पध्दती याचा विचार करता भारतीय समाज रचना विषमतेवर आधारलेली असून जाती व्यवस्था त्या विषमतेचे प्रतिक आहे. इतर देशांतील काही प्रमाणात विषमता आहे. पण भारतातील जातीवर आधारित विषमता वेगळी असून ही विषमता कर्तृत्वापेक्षा जन्मावर आधारित आहे. भारतातील प्रत्येक जातीची श्रेणी निश्चित असते. ती जन्माने प्राप्त झाल्यामुळे बदलता येत नाही. अमेरिकेतील वर्णावर आधारीत काळा—गोरा भेद देखील हा जन्माशी निगडित आहे. भारतातील जातीवर आधारित विषमता समानतेच्या हक्कांतील फार मोठा अडथळा आहे. आजच्या आधुनिक भारमातही जातीचा पगडा इतका मोठा आहे की, समानतेचा विचार जातीविरूध्द कृत्य ठरू शकतो.[५] विविध धर्मातील अठरापगड जाती, जमातींचा समान विकास करावा म्हणून भारतीय राज्यघटनेत न्यायसंस्थेसमोर सर्व नागरिक समान हे तत्त्वे एकीकडे स्वीकारले गेले आहे. तरी व्यवहारात मात्र भारतातील वर्णभेद, लिंगभेद, वंशभेद, धर्मभेद, भाषाभेद यातून निर्माण होणाऱ्या समस्यांवर प्रभावी उपाय सापडत नाही. ही आजही वास्तव स्थिती आहे.

भारताला स्वातंत्र मिळाल्या नंतर भारतीय राज्यघटनेची निर्मिती होताना भारतातील सर्व माणसांच्या मानवी हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे हे मुल्य रूढझाले. भारतातील प्रत्येक व्यक्तिच्या सर्वांगिण विकासासाठी पूरक आणि पोषक वातावरण निर्माण करून, प्रत्येक मानवी घटकांचा विकास करून, त्याला समानतेच्या पातळीवर संधी दिली पाहिजे. या विचाराला कायद्याने मान्यता देण्यात आली. मानवी हक्क संरक्षणामध्ये ज्या महत्वाच्या मुलभूत हक्कांची जाणीव करून दिली जाते त्यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय,

समानता, पर्यावरण संवर्धन, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मानवी संरक्षण, शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, आरोग्य संवर्धन, नोकरी या अनुषंगाने सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क, तसेच समान कामासाठी समान वेतन दिले पाहिजे हे होय.

लोकशाही शासनव्यवस्थेत काही राज्यकर्ते आपल्या व्यक्तिगत स्वार्थासाठी नागरिकांच्या मुलभूत हक्कांची पायमल्ली करतात. त्यामुळे त्याच्या हक्कांना संरक्षण देण्याची व्यवस्था करणे आवश्यक ठरते. आदिवासी समाज हा भारतीय समाजव्यवस्थेतील उपेक्षीत घटक आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समाज अप्रगत दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासीना मुलभूत हक्क देऊन राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु अनेक कारणामुळे त्याच्या मुलभूत हक्काची पायमल्ली होते. गरिबी, निरक्षरता, भ्रष्टाचार, हिंसाचार, दहशतवाद व विस्थापित होण्याचा प्रश्न यासारख्या कारण्यामुळे आदिवासी समाज मुलभूत हक्कांपासून वंचित राहतो व राष्ट्रविकासात अडसर निर्माण होत होता.

**भारतीय आदिवासीची स्थिती**

भारतीय राज्यघटनेने त्याना अनुसूचित जमाती म्हटले आहे. आदिवासी आपल्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी शिकार, मासेमारी, शेती, पशुपालन व हस्तव्यवसाय सारखे लहान – मोठे व्यवसाय करून आपला अर्थाजन चालवितो. इंग्रजांची राजवट भारतामध्ये स्थिरावल्यानंतर इंग्रज राज्यकर्त्यांनी जंगलाचे आरक्षण धोरण जाहीर केले. त्यामुळे अनेक शतके जंगलावर अवलंबून राहणाऱ्या आदिवासीसमोर मोठे संकट उभे राहिले. इंग्रजांच्या अन्यायी धोरणाविरूध्द आदिवासीनी बंडाचे निशान उभे केले. कोल, नागा, मुंडा, संथाळ, मिझा, लुशाई व महाराष्ट्रातील वारली व भिल्ल या आदिवासींनी केलेली बंडे आपली अस्मिता राखण्यासाठी प्रसिध्द ठरला आहेत. महाराष्ट्रातील वारली आदिवासींचा उठाव अनेक अर्थाने महत्वपूर्ण आहे. आत्यंतिक दारिद्रय, जुलूमी जमीनदार, जंगल कंत्राटदारांचे अत्याचार यामुळे उठाव घडून आला. वेठबिगारी, लग्नगडी प्रथा, गुलामगिरी, अमानुष शोषण याविरूध्द लढा दिला. आपला मुलभूत हक्क, अधिकार मिळविण्याच्या लढयामध्ये त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

जमीनदार , सावकार व सरकारकडून मोठा विरोध सहन करून सुध्दा वारली व भिल्ल चळवळीना फार मोठी प्रसिध्दी मिळाली. राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळाला. बऱ्याच प्रमाणात जमीनदार,सावकार व जंगल कंत्राटदार यांचे आदिवासीवर होणारे अन्याय – अत्याचार संपविण्यात यश आले. लढयाचा परिणाम म्हणून आदिवासींना त्यांची मुळ जमीन परत मिळाली. जंगल – जमिनीविषयक कायदे, गवतकापणी व वृक्षतोड याला योग्य मजूरी, शोषण व वेठबिगारापासून मुक्ती मिळाली व मुलभूत हक्क मिळविण्यात ते यशस्वी झाले. आपल्या मुलभूत हक्कासाठी त्यांनी लढा दिला. शोषणाविरूध्द लढा देऊन निर्भय जगण्याचा हक्क मिळविला परंतु आदिवासीच्या परिस्थितीमध्ये पूर्णतः बदल घडून आला नाही.[६]

स्वातंत्र्योत्तर काळात आधुनिक समाजाच्या संपर्काने आदिवासी समाज ढवळून निघाला. औद्योगिकीकरण, दळणवळण साधनांची उपलब्धता व विविध प्रकल्पाचा विकास योजनामुळे आदिवासी समाज प्रगत समाजाशी संपर्क टाळू शकला नाही. भारतीय राज्यघटनेतही आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी काही खास उपाययोजना करण्यात आल्या आहेत. घटनाकारांनी सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी दिली आहे. भारतीय राज्यघटनेत आदिवासींना' अनुसूचित जमाती असे संबोधण्यात आले आहे.[७]

**आदिवासीच्यासाठी घटनात्मक तरतुदी**

भारतीय समाजातील दुर्बळ व मागासलेल्या घटकांच्या कल्याणासाठी काही खास तरतुदी करूण ठेवल्या आहेत. समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरूध्दचा हक्क दिला आहेच पण त्याचबरोबर राज्यघटनेतील २४४व्या कलमात आदिवासीच्या

प्रशासनासंबंधी तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानूसार आदिवासी जमातीचे वास्तव्य असलेल्या प्रदेशांना राष्ट्रपती अनुसूचित प्रदेश म्हणून घोषीत करू शकतो. त्यानुसार जमीन हस्तांतर प्रतिबंध, सावकारी नियंत्रण व आदिवासी सल्लागार मंडळ स्थापन करून आदिवासीच्या विकास प्रश्नावर लक्ष केंद्रीत केले जाते. राज्यघटनेतील कलम २७५ (१) प्रमाणे आदिवासी कार्य मंत्रालयांतर्गत अर्थसहाय्य पुरविले जाते. राखीव जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे आदिवासी कार्य मंत्रालयांतर्गत अर्थसहसय्य पुरविले जाते. राखीव जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे आदिवासींचे मुलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे, त्याचा विकास व्हावा यासाठी शासनाने वेळोवेळी कल्याणकारी योजना त्याच्यासाठी राबविल्या आहेत. तरीसुध्दा आदिवासींना मुलभूत हक्क मिळण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

**आदिवासींच्या मुलभूत हक्कातील अडसर**

मानवी हक्काचे महत्व व आवश्यकता याची जाणीव समाजातील सर्व घटकांना झाली असली तरी जगाच्या विविध भागातील बऱ्याच व्यक्तींना मानवी हक्कापासून वंचित रहावे लागते ही वस्तुस्थिती आहे. देशातील राज्यकर्ते मानवी हक्क पायदळी तुडविण्यात धन्यता मानतात. तसेच लोकशाही स्विकारलेल्या सर्वच राष्ट्रातील मानवी हक्कांसंदर्भात परिस्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. भारतही त्याला अपवाद नाही. राष्ट्रातील नागरिक मानवी हक्कांपासून वंचित राहिल्यामुळे राष्ट्रविकासात अडसर निर्माण होत. तसेच व्यक्तिमत्व व समाज विकासासाठी अडसर निर्माण होत. त्यामुळे त्याची दखल घेणे आवश्यक आहे.[८]

आदिवासी हे आजही मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. आदिवासी गरीब असल्यामुळे जीवनावश्यक नैसर्गिक साधनावर सरकारी वा अन्य ठेकेदारांनी त्याच्या जमिनी जबरदस्तीने ताब्यात घेतल्या आणि मोठी धरणे बांधण्यात आली. उदा: नर्मदा धरण प्रकल्पामुळे नर्मदा खोऱ्यातील सुमारे १० लाख आदिवासींना त्यांच्या गावातून विस्थापित व्हावे लागले. झारखंड प्रांतात देखील आदिवासी त्याच्या स्वायत्तेसाठी संघर्ष करीत आहेत. प्रादेशिक एकात्मता व स्वायत्तता हे आदिवासीचे हक्क असूनही ते त्यांना नाकारले जात आहेत. आदिवासी ज्या प्रदेशात राहतात तेथून त्यांना विस्थापित करणे हे आदिवासींच्या मुलभूत हक्काचे उल्लंघन होय. सन १९५१ ते १९९० पर्यंत २१३ लाख आदिवासी विस्थापित झाले आहेत. आदिवासांना त्याच्या कामाचे किमान वेतन मिळत नाही, स्त्रियांचे शारीरिक शोषण केले जाते. आज आदिवासींना सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक संकटांना सामना करावा लागत आहे. एकूणच अदिवासीचा इतिहासीचा इतिहास म्हणजे पूर्ण दमनाचा, शोषणांचा, विस्थापनाचा इतिहास होय. आर.जे.के कुटूम म्हणतात की, ‘‘अनेक आदिवासींना जगातील अनेक देशातून निपात करण्यात आला. त्याच्या संस्कृतीला चिरडून टाकण्यात आले. उर्वरित आदिवासी जमाती एक तर नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत किंवा त्यांच्यावर गुलामगिरी लादली जात आहे.’’[९]

लोकशाही शासन प्रणालीत जरी आदिवासींना जगण्यासाठी मुलभूत हक्क प्रदान केले असले तरी दडपशाहीच्या जोरावर त्यांना नमविले जाते. पाशवी दडपण आणले जाते. हीन वागणूक देऊन त्याच्यावर आत्याचार केले जातात. गरिबी, दारिद्रय, बेरोजगारी व हिंसाचार यामुळे नागरिक म्हणून मुलभूत हक्कांचा उपभोग त्यांना घेता येत नाही. त्यामुळे सरकार व स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

आदिवासी समाज जंगल पहाडात रहात असल्यामुळे त्यांच्यात निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. तीन चार घरांचा पाडा असलेली आदिवासी ठीकाणे उंच डोंगरावर असल्याने शैक्षणिक सुविधा त्यांच्या पर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे तो आजही निरक्षर आहे. निरक्षरतेमुळे त्यांच्यात अंधश्रध्दा आणि व्यसनाधिनता यांचे प्रमाण आधिक आहे. आदिवासींना जोपर्यंत शिक्षणाचा हक्क मिळत नाही तोपर्यत तो मुख्य प्रवाहात येणे अवघड आहे. आदिवासी समाजातील काही आश्रम शाळेत शिक्षण घेऊन जागृत झालेली तरूण

पिढी नोकरीच्या शोधात शहतात येते. परंतु शहरातील आदिवासींसाठी असणाऱ्या नोकऱ्या इतर बिगर आदिवासी समाजातील लोकानी हिसकावून घेतल्यामुळे शिक्षण असून नोकरी नाही अशी त्यांची अवस्था झालेली आहे.[१०]

जल, जंगल आणि जमीन यावर आमचा पारंपारीक हक्क आहे तो हक्क कोणी हिरावून घेवू नये अशी तो विनवणी करतो. परंतु बदलणाऱ्या नवनवीन कायद्यांमुळे आदिवासी समाज त्यांच्या हक्कांपासून बाजुला फेकला जातो, त्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण होतात. गोंडवाना. भिलवाडा आणि नागालॅंड ही आमची स्वतंत्र राज्ये होती ती आम्हाला पुन्हा मिळाली पाहिजेत. त्यासाठी आदिवासी स्वतंत्र राज्याची मागणी करताना दिसत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आदिवासी जमातींच्या विकासासाठी योजना राबवल्या गेल्या राष्ट्रीय आदिवासी आयोग, आदिवासीविकास मंडळे स्थापन करून आदिवासींचा विकास होण्यासाठी अनुकूल पाऊले उचलली गेली. परंतु आदिवासींसाठी राबविलेल्या विकास योजना त्यांच्या पाड्यांपर्यंत समाधानकारक पोहोचत नसल्यामुळे त्या योजना फक्त कागदावर असून आदिवासींच्या हातात काही नाही असे चित्र दिसत आहे.

आदिवासी जमाती आपल्या अस्तित्त्वासाठी मानवी हक्कांसाठी संघर्ष करताना दिसत आहे. सावकार, कंत्राटदार, जमीनदार आणि इतर घटक यांच्याकडून आदिवासी समाजाला त्रास होताना दिसत आहे. आदिवासींची पिळवणूक करण्याचा आपल्याला आधिकार आहे असा त्यांचा गैरसमज आहे. आदिवासींना कर्ज देऊन त्यांच्या जमीनी त्यांनी हिसकावून घेतलेल्या आहेत. त्यामुळे स्वत:च्या जमीनीवरच तो वर्षानुवर्ष राबताना दिसत आहे. जंगल कायद्यामुळे जंगलात जाता येत नाही स्वत:ची जमीन सावकाराकडे असल्यामुळे शेतीही करता येत नाही. व्यापारी लोकानी विनापरवाना आपली दारूची दुकाने आदिवासी भागात उभारून त्यांना व्यसनाधीनतेकडे जाण्यास भाग पाडलेले आहे.[११]

आदिवासींना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी त्याना खरी स्वायत्तता व समता प्रदान करणे आवश्यक आहे.आदिवासीच्या मुलभूत हक्कांचे उल्लंघन होणे हे नैसर्गिक व सामाजिक न्यायाला धरून नाही तसेच एकविसाव्या शतकातील महासत्ता भारताला भूषणावह नाही त्यामुळे आदिवासीना घटनेने दिलेले मुलभूत हक्क मिळणे हा त्यांचा मुलभूत अधिकार आहे. एकूणच भारतीय राज्यघटनेचे आदिवासी जमातींना जे मानवी हक्क दिलेले आहेत त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने झाल्यास आदिवासी मुख्य प्रवाहात येऊ शकतील यासाठी आदिवासी विकास योजना भ्रष्टाचार मुक्त राबवल्या पाहिजेत तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता यांची प्रामाणीकपणे अंमलबजावणी झाली पाहिजे आदिवासी समाजाची संस्कृती समृध्द आहे तिचे संवर्धन केल्यास खऱ्या अर्थाने मानवी हक्कांचे संवर्धन होईल असे वाटते.

## संदर्भ सूची

१. तुमचे हक्क जाणून घ्या, माहिती पुस्तिका, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली, २०१०.
२. चतुर्वेदी ललित, मानव अधिकार एवं कर्तव्य, रितू पब्लिकेशन, जयपूर, २०११, पृ.क्र. २७.
३. घनश्याम शहा—भारतीय सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन पुणे, पृ.क्र. २०२
४. भारतीय संविधान, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्यावतीने मुद्रीत व प्रकाशित, शासकिय मुद्रणालय, नागपूर, २००२.
५. कुलकर्णी पी.के. 'मानवी हक्क व सामाजिक न्याय' डायमंड पब्लीकेशन पुणे २०१५ पृ.क्र. १५०.
६. वराडकर र.घ. 'राजकीय सिध्दांताची मूलतत्त्वे निराली प्रकाशन पुणे २००३ पृ. क्र. १६७.

७. कुलकर्णी पी.के. 'मानवी हक्क व सामाजिक न्याय' डायमंड पब्लीकेशन पुणे २०१५ पृ.क्र. १०२—१०३.
८. चौधरी प्रकाश आदिवासीचा उठाव भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) प्रकाशित ठाणे जिल्हा कमिटी, ठाणे, १९९७. पृ.क्र. ३—४
९. डॉ. वळवी दिपक कुमार 'आदिवासी समाजाच्या मानवी हक्कांचे संवर्धन, मानवी हक्काचे स्वरूप व वास्तव 'राष्ट्रीय चर्चासत्र' कमला कॉलेज कोल्हापूर. २०१६ पृ.क्र. १९०.
१०. उपरोक्त पृ.क्र. १९१.